N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** कोडोली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ)**:**30/05/2023 16:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना)**:**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 29/05/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/05/2023
   **Time From (वेळेपासून):** 12:50 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:57 बजे

2. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 3
   **Date From (दिनांक पासून):** 30/05/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/05/2023
   **Time From (वेळेपासून):** 09:15 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 09:17 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे)**:**

**Date (दिनांक ):** 30/05/2023 **Time (वेळ):** 15:30 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ )**:**

**Entry No. (नोंद क्र.):** 016

**Date & Time** (दिनांक आणि वेळ)**:** 30/05/2023 16:01 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार)**:** लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ)**:**

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर)**:**

दक्षिण, 30 किमी **Beat No.** (बिट क्र.)**:**

(b) **Address** (पत्ता)**:** आरोग्य उपसंचालक कार्यालय , कोल्हापुर ,करवीर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास)**:**

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District(State)** (जिल्हा(राज्य))**:**

2.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
उत्तर, 2 किमी
**Beat No.** (बिट क्र.):
(b) **Address** (पत्ता): सतिश इंगळे यांचेघरी , कोडोली,पन्हाळा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
(a) **Name** (नाव): सतिश महादेव इंगळे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1964
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोडोली,पन्हाळा ,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोडोली,पन्हाळा ,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मारूती परशुराम वरूटे | | | 1. सुनंदा पार्क,कोल्हापुर , कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | विलास जिवनराव शिंदे | | | 1. सरकारी हायस्कुल कॉलनी, पारगाव,हातकणंगले ,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 3 | शिवम विलास शिंदे | | | 1. सरकारी हॉस्पीटल कॉलनी , पारगाव,हातकणंगले ,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू किमतीच्या 50 नोटा मिळुन किस. | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

25,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी सतीश महादेव इंगळे, वय 59, व्यवसाय - सेवानिवृत्त, रा. मु.पो. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, मो.नं. 8668208509 आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की,

मी दिनांक 29/05/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उप अधीक्षक श्री सरदार नाळे यांचेसमक्ष हजर राहुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रारी अर्ज दिला होता त्यामधील तक्रार अशी की, मी दि. 31/05/2022 रोजी शासकीय सेवेतुन नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालो आहे. सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभातील रजा रोखीकरण प्रस्ताव मी यापुर्वी कार्यरत असलेल्या मलकापूर ग्रामीण रूग्णालयामार्फत उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ, कार्यालयास माहे ऑक्टोबर 2022 मध्ये सादर केला आहे. परंतु अद्याप सदरचा प्रस्ताव मंजुर झालेला नाही. म्हणुन मी दि. 16/05/2023 रोजी मला उपसंचालक कार्यालयातील सहायक अधीक्षक वरूटे यांना मोबाईलवरून कॉल केला असता त्यांनी माझ्या रजा रोखीकरणाच्या प्रस्तावामध्ये त्रुटी काढत नाही व तुमचा प्रस्तावात अतिरिक्त रजेसह मंजुर करतो, पण त्यासाठी तुम्ही मला 30,000/- रूपये द्यावे लागतील तरच तुमचा प्रस्ताव मंजुर होईल असे सांगुन माझेकडे 30,000/- रूपये लाचची मागणी केली आहे तरी त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन मी तक्रारी अर्ज दिला असुन आज रोजी मी त्यांना भेटायला जाणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर नाळे साहेबांनी पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथील कार्यालयातुन करण्याचे आहे सांगीतले. नाळे साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचाना देवुन त्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर सहायक अधीक्षक वरूटे यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने मला तसेच पंच नं. 1 अमोल तावडे यांना योग्य त्या सुचना

दिल्या. त्यानंतर नाळे साहेबांनी त्याचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 असे अॅन्टी करप्शन ऑफीस मधुन माझेकडील मोटर सायकलने सेंट्रल बिल्डींगमध्ये असलेल्या वरूटे साहेब बसत असलेल्या ठिकाणी गेलो. तेथे मी वरूटे साहेबांना भेटलो. त्यावेळी आमचेत माझे सेवानिवृत्ती नंतरच्या रजा रोखीकरणबाबत बोलणे झाले त्यावेळी वरूटे यांनी तुम्हाला एक लाख दहा हजार रूपये फायदा होणार आहे काय करताय सांगा असे बोलुन कागदावर 30,000/- रूपये लिहुन मला दाखविले त्यावेळी मी त्यांना 30,000/- रूपये तुम्हाला द्यायचे जास्त होतय ओ तिस हजार असे म्हणालो त्यावेळी वरूटे यांनी मग पाच हजार कमी द्या असे म्हणुन माझेकडे 25,000/- रूपयांची मागणी केली व उदया दिनांक 30/05/2023 रोजी पैसे कोडोलीत द्या मी तुम्हाला फोन करून कोणाला द्यायचे ते सांगतो असे म्हणाले त्यांनतर मी त्यांना उद्या फोन करतो असे म्हणालो त्यानंतर मी व पंच नं. 1 तावडे असे अॅन्टी करप्शन ऑफीसमध्ये परत आलो. तेथे त्यांनी मला व पंच 1 कांबळे यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली. त्यानंतर नाळे साहेबांनी उदया दि. 30/05/2023 रोजी सकाळी 09.00 वाजता माझे घरी येवुन तेथुन वरूटे यांना फोन करून ते ज्याचेकडे पैसे देण्यास सांगतील त्याप्रमाणे सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरले.

दिनांक 30/05/2023 रोजी सकाळी 08.30 वाजता नाळे साहेब, पंच, व त्यांचा स्टाफ असे आमचे घरी कोडोली येथे आले त्यावेळी सहायक अधीक्षक वरूटे यांच्यावर सापळा कारवाई अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 25,000/- रूपयांच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व सापळा पथकातील अमलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने नाळे साहेबांनी सुचना दिल्या. त्यावेळी नाळे साहेबांचे सुचनेवरून मी काल वरूटे साहेबांनी सांगीतले प्रमाणे त्यांना माझे मोबाईलवरून त्यांना फोन केला त्यावेळी मी त्यांना पुढेचे नियोजन काय असे विचो त्यावेळी वरूटे यांनी पारगावात शिंदे ड्रायव्हरकडे द्या मी त्याला पाठवुन देतो असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर काहीवेळाने मला वरूटेंचा फोन आला त्यावेळी त्यांनी मला शिंदे पैसे घ्यायला घाबरत आहेत असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना तुमच्याकडे येवुन देवु का असे म्हणालो त्यावेळी त्यांनी नको म्हणुन शिंदे लास्कर किंवा तेजसकडे करा असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर पुन्हा काहीवेळाने मला वरूटेंचा पुन्हा फोन आला शिंदे ला जाता जाता पारगावमध्ये पैसे द्या त्याला मी एक वस्तु देणार आहे ती घ्या असे म्हणालो त्यावेळी तो पैशाचे असेल तर नको म्हणात असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना पुन्हा सरळ तुमच्याकडे येवुन देवुन जावु का असे म्हणालो त्यावेळी त्यांनी नको असे म्हणुन तुम्ही शिंदे कडे द्या असे म्हणाले. दरम्यान शिंदे ड्रायव्हर यांचा मला फोन आला व तो माझे घराचे खाली आल्याचे सांगीतले. त्यावेळी मी त्याला पाच मिनीटात आलो असे सांगीतले. सदरचे वरील सर्व कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केले आहेत. त्यानंतर शिंदे ड्रायव्हर यास भेटण्यास जाण्यापुर्वी व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकविले त्यानंतर मी व पंच तावडे असे माझे घराचे पहिल्या मजल्यावरून खाली आलो. त्यावेळी शिंदे एका मुलास घेवुन घराखाली येवुन थाबले होते. त्यावेळी आमचेत रजा रोखीकरण व माझे रिटायर्डमेन्टचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी मी शिंदे यांना माझे रजा रोखीकरणाचा प्रस्ताव मंजुर करणेसाठी वरूटे साहेब 25,000/-रूपये मागत आहेत असे म्हणालो त्यावेळी शिंदे यांनी द्या की मग काय झाले असे म्हणुन माझेकडे पैसे मागीतले. त्यावेळी मी शिंदे यांचेकडे पैसे देत असताना त्याने सदरचे पैसे त्याचेबरोबर आलेल्या मुलग्याकडे द्यायला सांगीतले व त्याला मोजुन घे असे सांगीतले त्यावेळी मी सदरचे 25,000/- रूपये शिंदे यांचे सोबत आलेल्या मुलाकडे दिले त्याने ते पैसे घेतले व मोजुन पाहीले व त्यांचे पॅन्टचे उजवे खिशात ठेवले. त्यानंतर लागलीच नाळे साहेब, पंच नं.1 तावडे व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन शिंदे व त्यांचे सोबत असले मुलग्यास पकडले. त्यानंतर ड्रायव्हर शिंदे यांनी त्याचे सोबत असलेला त्यांचा मुलगा शिवम असल्याचे सांगीतले. त्यावेळी ड्रायव्हर शिंदे यांनी वरूटे यांना फोन लावुन त्यांनी सांगीतलेप्रमाणे इंगळे साहेब यांचेकडुन 25,000/- रूपये घेतले असुन ते पैसे मुलगा शिवम याने त्याचेकडे घेवुन ते पैसे मोजुन घेतले आहेत. त्याला तुमच्याकडे पाठवतो असे म्हणाले त्यावेळी वरूटे यांनी चालतय चालतय असे म्हणाले. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला.

त्यानंतर नाळे साहेब यांनी पो.नि.कुंभार याना सहायक अधीक्षक वरूटे यांना ताब्यात घेण्याची सुचना केली. त्यावेळी शिंदे ड्रायव्हर यांचे नाव विलास जिवनराव शिंदे, वय - 57 वर्षे, चालक ग्रामीण रूग्णालय पारगाव, ता. हातकणंगले सध्या रा. सरकारी हॉस्पीटल कॉलनी पारगाव, ता. हातकणंगले, मुळ रा. किणी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर असे असुन शिवम याचे नाव शिवम विलास शिंदे, वय - 22 वर्षे, सध्या रा. सरकारी हॉस्पीटल कॉलनी पारगाव, ता. हातकणंगले, मुळ रास. किणी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर असे असल्याचे समजले. माझे घरी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही कोडोली पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली. दरम्यान तेथे अॅन्टी

करप्शन ब्युरोचे पथकाने वरूटे यांना हजर केले त्यावेळी त्यांचे नाव मारूती परशुराम वरूटे, वय- 50 वर्षे, सहायक अधीक्षक, उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालय कोल्हापूर सद्या रा. प्लॉट नं.4, सुनंदा पार्क, पोतदार हायस्कुल जवळ कोल्हापूर, मुळ रा. कासारपुतळे, ता. राधानगरी , जि.कोल्हापूर असे असल्याचे समले. तरी माझ्या रजा रोखीकरणाचे प्रस्तावामध्ये त्रुटी काढत नाही व तुमचा प्रस्तावात अतिरिक्त रजेसह मंजुर करतो, पण त्यासाठी माझेकडे सहायक अधीक्षक वरूटे यांनी माझेकडे अप्रामाणिकपणे 30,000/- रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडी अतंी 25,000/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच सदरची लाच रक्कम विलास जिवनराव शिंदे, वय - 57 वर्षे, चालक ग्रामीण रूग्णालय पारगाव, ता. हातकणंगले यांना घेण्यास सांगीतली. त्याप्रमाणे विलास शिंदे व त्यांचा मुलगा शिवम शिंदे असे लाच स्विकारण्यास आले त्यावेळी विलास शिंदे यांनी वरूटे यांनी मागणी केलेली लाच रक्कमेची मागणी करून ती रक्कम त्याचा मुलगा शिवम यास घेण्यास सांगीतली. त्याप्रमाणे मी लाच रक्कम शिवम शिंदे याचेकडे दिली त्यावेळी लाच रक्कम स्विकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने विलास शिंदे व शिवम शिंदे यांना अप्रामाणिकपणे अपप्रेरणा देवुन लाच स्विकारताना रंगेहाथ पकडले आहे. विलास म्हणून माझी 1) मारूती परशुराम वरूटे, वय- 50 वषर्े, सहायक अधीक्ष, उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालय कोल्हापूर 2) विलास जिवनराव शिंदे, वय - 57 वर्षे, चालक ग्रामीण रूग्णालय पारगाव, ता. हातकणंगले, 3) शिवम विलास शिंदे, वय - 22 वर्षे, सध्या रा. सरकारी हॉस्पीटल कॉलनी पारगाव, ता. हातकणंगले, मुळ रास. किणी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Shitalkumar Anilkumar Doijad(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत गोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Sjugale S.M. Ingale.

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

FIR copy Received
Sjugale

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Shitalkumar Anilkum
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

ठाणे अंमलदार
कोडोली पोलीस ठाणे